**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**बांधकाम विभाग**

**विषय:- भिनिशमनपा चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) मार्फत राबविणे बाबत.**

**प्रस्तावना**

मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४-अ या जागेवर प्रधानमंत्री आवास योजना घटक-३ (AHP) अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तिंकरीता ६३४८ EWS घरे/सदनिका बांधणेकामी मनपा नियुक्त प्रकल्प ठेकेदार मे.पी.एस.पी.प्रोजेक्टस लि. यांना दि.०६/१०/२०२१ रोजी रितसर नोटीस देऊन त्यांची संविदा रदद करणेची कारवाई केली असून ठेकेदाराने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.८९/२०२१ मध्ये बँक गॅरंटी जप्त करण्यास मनाई असून दाव्यात पारित आदेशानुसार ३ सदस्यीय लवाद पॅनल नेमून सदयस्थितीत लवाद प्रक्रिया सुरु आहे.

उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने मा.महासभा ठराव क्रमांक ५२३ दि.२७/०४/२०२२ विषयी नगर विकास विभागाकडे दि.२७/१०/२०२२ चे पत्रान्वये मार्गदर्शन अपेक्षिले होते. नगर विकास विभागाने शासन आदेश क्र.एमयुएम-२०२२/प्र.क्र.३१७/नवि-१७ दि.०२ डिसेंबर २०२२ अन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिके मार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेला ६३४८ घरांचा बांधकाम प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ने हाती घेण्याचे निर्देश दिले. परंतु शासन आदेशाचे अनुषंगाने भिनिशमनपाने म्हाडाकडे वेळोवेळी लेखी पत्राव्दारे पाठपुरावा करुन सुध्दा प्रकल्प राबविणे बाबत म्हाडा कडुन कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान काळात सदर प्रकल्प महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) राबविणेस इच्छुक असल्याबाबत त्यांनी म्हाडाकडे दि.०७/०७/२०२३ रोजी पत्राद्वारे कळविले. म्हाडाने दि.०३/०८/२०२३ चे पत्राद्वारे महाप्रितने प्रकल्प हाती घेण्यास म्हाडाची हरकत नसल्याबाबत महाप्रितला कळविले आहे त्यामुळे यावरुन म्हाडास सदर प्रकल्प राबविणेस स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होते.

महाप्रितने दि.०४/०८/२०२३ चे पत्रान्वये नगर विकास विभागाकडे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प महाप्रितकडे वर्ग करणेबाबत विनंती केल्याप्रमाणे नगर विकास विभागाने दि.२५/०८/२०२३ रोजी भिनिशमनपास विषयांकित प्रकल्पाबाबत अभिप्रायासह प्रस्ताव तातडीने पाठविणे बाबत निर्देशीत केले. भिनिशमनपाने दि.२६/०८/२०२३ चे पत्रान्वये प्रकल्प म्हाडा ऐवजी महाप्रित यांचे मार्फत हाती घेण्यास हरकत नसल्याचे व प्रकल्प राबविणेसाठी महाप्रित सोबत सामंजस्य करार करुन प्रकल्प महाप्रितकडे वर्ग करणे बाबत आदेश होणेकामी नगर विकास विभागास विनंती केली. त्या अनुषंगाने नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.एमयुएम-२०२२/प्र.क्र.३१७/नवि-१७ दि.१५ सप्टेंबर २०२३ नुसार मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प अटी/शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविण्यास मान्यता दिली आहे. विषयांकित प्रकल्प

राबविताना भिनिशमनपाचे आर्थिक हितसंबंधास बाधा न येता सदर प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे प्रस्तावित आहेत.

१) महाप्रित मार्फत सदर प्रकल्पाचे नवीन UDCPR प्रमाणे व नविन SSR नुसार सुधारित DPR तयार केले जाणार असुन प्रकल्पअंतर्गत सर्व प्रकारच्या पायाभुत सुविधांसह EWS सदनिका, LIG सदनिका व कमर्शिअल बांधकाम केले जाणार आहे.

२) महाप्रित सदर प्रकल्पासाठी केंद्र शासन, राज्य शासन व इतर विभागाकडील आवश्यक सर्व प्रकारच्या मंजु-या, परवानग्या, ना-हरकत दाखले इ. प्राप्त करुन घेणार आहे.

३) सदर प्रकल्पाकरिता आवश्यक कंसल्टंट, कॉन्ट्रक्टर इ. विविध एजन्सीज नेमुन प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्याची जबाबदारी महाप्रितची राहिल. सदर प्रकल्पाकरिता लागणारा आवश्यक संपुर्ण खर्च महाप्रित उचलणार असुन भिनिशमनपास कोणताही खर्च करावा लागणार नाही.

४) प्रकल्प अंतर्गत बांधल्या जाणा-या EWS सदनिका, LIG सदनिका व कमर्शिअल बांधकामाची विक्रीची संपुर्ण जबाबदारी ही महाप्रित यांची राहणार आहे.

५) महाप्रित शासन निर्णयानुसार LIG घटकांचे एकुण बांधकाम क्षेत्रफळाच्या ३०% बांधकाम क्षेत्रफळ व एकुण कमर्शिअल बांधकाम क्षेत्रफळाच्या १०% बांधकाम क्षेत्रफळ भिनिशमनपास लाभ/मोबदला म्हणुन देणार आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत सद्यस्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१अ) नुसार मा.महासभा व मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक यांचेकडे असल्याने मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविणेकामी मान्यता मिळणे बाबत तसेच महाप्रित सोबत सामंजस्य करार करणेकामी मान्यता मिळणे बाबतची प्रस्तावना मा.प्रशासक यांचे मंजुरीकरिता सादर करणेंत येत आहे.

(सुनिल घुगे)
**शहर अभियंता**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## बांधकाम विभाग

**विषय:- भिनिशमनपा चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) मार्फत राबविणे बाबत.**

**प्रस्तावना**

मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४-अ या जागेवर प्रधानमंत्री आवास योजना घटक-३ (AHP) अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तिंकरीता ६३४८ EWS घरे/सदनिका बांधणेकामी मनपा नियुक्त प्रकल्प ठेकेदार मे.पी.एस.पी.प्रोजेक्टस लि. यांना दि.०६/१०/२०२१ रोजी रितसर नोटीस देऊन त्यांची संविदा रदद करणेची कारवाई केली असून ठेकेदाराने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.८९/२०२१ मध्ये बँक गॅरंटी जप्त करण्यास मनाई असून दाव्यात पारित आदेशानुसार ३ सदस्यीय लवाद पॅनल नेमून सदयस्थितीत लवाद प्रक्रिया सुरु आहे.

उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने मा.महासभा ठराव क्रमांक ५२३ दि.२७/०४/२०२२ विषयी नगर विकास विभागाकडे दि.२७/१०/२०२२ चे पत्रान्वये मार्गदर्शन अपेक्षिले होते. नगर विकास विभागाने शासन आदेश क्र.एमयुएम-२०२२/प्र.क्र.३१७/नवि-१७ दि.०२ डिसेंबर २०२२ अन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिके मार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेला ६३४८ घरांचा बांधकाम प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ने हाती घेण्याचे निर्देश दिले. परंतु शासन आदेशाचे अनुषंगाने भिनिशमनपाने म्हाडाकडे वेळोवेळी लेखी पत्राव्दारे पाठपुरावा करुन सुध्दा प्रकल्प राबविणे बाबत म्हाडा कडुन कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान काळात सदर प्रकल्प महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) राबविणेस इच्छुक असल्याबाबत त्यांनी म्हाडाकडे दि.०७/०७/२०२३ रोजी पत्राद्वारे कळविले. म्हाडाने दि.०३/०८/२०२३ चे पत्राद्वारे महाप्रितने प्रकल्प हाती घेण्यास म्हाडाची हरकत नसल्याबाबत महाप्रितला कळविले आहे त्यामुळे यावरुन म्हाडास सदर प्रकल्प राबविणेस स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होते.

महाप्रितने दि.०४/०८/२०२३ चे पत्रान्वये नगर विकास विभागाकडे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प महाप्रितकडे वर्ग करणेबाबत विनंती केल्याप्रमाणे नगर विकास विभागाने दि.२५/०८/२०२३ रोजी भिनिशमनपास विषयांकित प्रकल्पाबाबत अभिप्रायासह प्रस्ताव तातडीने पाठविणे बाबत निर्देशीत केले. भिनिशमनपाने दि.२६/०८/२०२३ चे पत्रान्वये प्रकल्प म्हाडा ऐवजी महाप्रित यांचे मार्फत हाती घेण्यास हरकत नसल्याचे व प्रकल्प राबविणेसाठी महाप्रित सोबत सामंजस्य करार करुन प्रकल्प महाप्रितकडे वर्ग करणे बाबत आदेश होणेकामी नगर विकास विभागास विनंती केली. त्या अनुषंगाने नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.एमयुएम-२०२२/प्र.क्र.३१७/नवि-१७ दि.१५ सप्टेंबर २०२३ नुसार मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प अटी/शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविण्यास मान्यता दिली आहे. विषयांकित प्रकल्प राबविताना भिनिशमनपाचे आर्थिक हितसंबंधास बाधा न येता सदर प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे प्रस्तावित आहेत.

१) महाप्रित मार्फत सदर प्रकल्पाचे नवीन UDCPR प्रमाणे व नविन SSR नुसार सुधारित DPR तयार केले जाणार असुन प्रकल्पअंतर्गत सर्व प्रकारच्या पायाभुत सुविधांसह EWS सदनिका, LIG सदनिका व कमर्शिअल बांधकाम केले जाणार आहे.

२) महाप्रित सदर प्रकल्पासाठी केंद्र शासन, राज्य शासन व इतर विभागाकडील आवश्यक सर्व प्रकारच्या मंजु-या, परवानग्या, ना-हरकत दाखले इ. प्राप्त करुन घेणार आहे.

३) सदर प्रकल्पाकरिता आवश्यक कंसल्टंट, कॉन्ट्रक्टर इ. विविध एजन्सीज नेमुन प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्याची जबाबदारी महाप्रितची राहिल. सदर प्रकल्पाकरिता लागणारा आवश्यक संपुर्ण खर्च महाप्रित उचलणार असुन भिनिशमनपास कोणताही खर्च करावा लागणार नाही.

४) प्रकल्प अंतर्गत बांधल्या जाणा-या EWS सदनिका, LIG सदनिका व कमर्शिअल बांधकामाची विक्रीची संपुर्ण जबाबदारी ही महाप्रित यांची राहणार आहे.

५) महाप्रित शासन निर्णयानुसार LIG घटकांचे एकुण बांधकाम क्षेत्रफळाच्या ३०% बांधकाम क्षेत्रफळ व एकुण कमर्शिअल बांधकाम क्षेत्रफळाच्या १०% बांधकाम क्षेत्रफळ भिनिशमनपास लाभ/मोबदला म्हणुन देणार आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत सद्यस्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१अ) नुसार मा.महासभा व मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक यांचेकडे असल्याने मौजे चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविणेकामी मान्यता मिळणे बाबत तसेच महाप्रित सोबत सामंजस्य करार करणेकामी मान्यता मिळणे बाबतची प्रस्तावना मा.प्रशासक यांचे मंजुरीकरिता सादर करणेंत येत आहे.

**ठराव क्रमांक** २५८ **दिनांक:-** 20/09/2023

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१अ) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, चाविंद्रा/पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता घरांचा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) ऐवजी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभुत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) द्वारे राबविणेकामी प्रशासनाने सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावानुसार मान्यता देत असुन महाप्रित सोबत सामंजस्य करार करणेस मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका